■ बीड (महाराष्ट्र) ■ सायं.दैनिक ■ मराठी ■ वर्ष – ०२ ■ अंक – २६९ ■ मंगळवार दि.१७ जून २०२५ ■ आरएनआय – एमएएचएमएआर/२०२३/८३९६५ ■ किंमत ३ रू. । पाने ४

■ Beed (Maharashtra) ■ Daily Evening ■ Marathi ■ Year - 02 ■ Issue - 269 ■ Tuesday Dt.17 June 2025 ■ RNI : MAHMAR/2023/83965 ■ Price - 3 Rupees ■ Pages 4

# एसपींच्या आदेशाला केराची टोपली देणाऱ्या चकलांबा पोलीस ठाणे प्रमुखाला निलंबित करा?

## एसपींची दिशाभूल करणारा पोलीस निरीक्षक जगात कुठेच नाही पाहिला मात्र चकलांब्याच्या हद्दीत दिसला?

अन्याय, अत्याचार, भ्रष्टाचाराचा कर्दनकाळ
सायं.दैनिक महाराष्ट्र
आरंभ
संपादक : दिपक थोरात Mob.9860898564



# एसपी साहेब, तुमची दिशाभूल करणाऱ्या पोलीस निरीक्षक संदीप पाटीलवर कारवाई करून गोदापात्रात वसुली करणाऱ्या त्या दोन पोलीस कर्मचाऱ्यांना निलंबित करा?

## पाटील साहेब हे खरं आहे का? गोदापात्रात जाऊन दुसऱ्या स्पॉटचा लोकेशन एसपींना पाठवून दिशाभूल केली असल्याची दबक्या आवाजात चकलांबा परिसरात चर्चा?

### पोलीस निरीक्षक संदीप पाटलांचा गोदापात्रात राजेशाही थाट; एका ट्रॅक्टरला आणि एका लोडरला सात हजार रुपये प्रमाणे एका नाईटचा भाव?

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई तालुक्यातील चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीतील राक्षसभूवन, पांचाळेश्वर परिसरातून गोदावरी नदी वाहते. या गोदावरी नदीच्या पात्रातून रात्रीच्या वेळी रोज हजारो ब्रास बेकायदेशीर वाळू उपसा होत असून, चकलांबा पोलीस प्रशासन याकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष करून वाळू माफियांवर कुठलीही कारवाई केली जात नसल्याने प्रशासनाच्या कार्यक्षमतेवर संशय निर्माण होत आहे. तसेच चकलांबा पोलिसांकडून एका रात्रीचा भाव ठरला असल्याची जोरदार चर्चा आहे. एका ट्रॅक्टरला आणि एका लोडरला सात हजार रुपये प्रमाणे चकलांबा पोलिसांचा भाव ठरलेला असल्याची माहिती मिळत आहे. यामुळे पोलिसांच्या नाकावर टिच्चून वाळू उपसा होत आहे. राक्षसभूवन गोदापात्रात बीड येथून स्थानिक गुन्हे शाखेचे पथक कारवाई करत आहे पण चकलांबा पोलिसांना याचा पत्ता लागत नाही. वाळू वाहतूक जोरदार झाली असून फक्त पाडळसिंगीचा टोलनाका टाळून हा गोरखधंदा सुरू आहे. मात्र आपल्या चकलांबा पोलीस ठाण्याच्या हद्दीत कसलेच अवैध धंदे वाळू वाहतुक, चोरटी वाहतुक होत नसल्याचा आव पोलीस निरीक्षक संदीप पाटील हे करीत आहेत. मात्र पोलीस निरीक्षक पाटील यांचा आव स्थानिक गुन्हे शाखेच्या शिवाजी बंटेवार यांनी उघडा पाडला आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत कॉवत यांनी बीड जिल्ह्याची धुरा हाती घेतल्यापासून जिल्ह्यातील गुन्हेगारीचे कंबरडे मोडले तसेच जिल्ह्यातील अवैध धंदे टार्गेट केले. अवैध दारू, मटका, गुटका यावर कारवाई करून बऱ्यापैकी यश मिळवले आहे. पण वाळू हा मोठा अवैध धंदा आहे यातून मोठे अर्थकारण आणि त्यातून गुन्हेगारीत वाढ हे लक्षात येताच त्यावर लक्ष केंद्रित करून वाळू माफियांना सळो की, पळो करून सोडले. इतकेच नव्हे तर अनेक वेळा पोलीस अधीक्षक कार्यालयात बोलावून हजेरी घेऊन त्यांच्याकडून बॉण्ड लिहून घेतले आहे. कडक कारवाई करण्याचा इशारा देखील दिला आहे. परंतु चकलांबा पोलिसांच्या आशीर्वादाने आणि पाठबळाने वाळू माफिया पुन्हा गोदापात्रात सक्रिय होऊन रात्रीच्या वेळी हजारो ब्रास वाळू उपसा करून त्याची वाहतूक करत आहेत. चकलांबा पोलिसांचा रात्रीचा भाव ठरल्यामुळे याकडे ते दुर्लक्ष करताना दिसत आहे.

राक्षसभूवन पात्रातून अवैध वाळू उपसा सुरू आहे. शासनाकडून कुठलेही टेंडर काढण्यात आलेले नसताना. बेकायदेशीर वाळूची चोरी करून शासनाच्या नियमांना पायदळी तुडवण्याचे काम सर्रासपणे सुरू आहे. मात्र चकलांबा पोलीस प्रशासन वाळू माफियावर अद्याप कुठलीच कारवाई केली जात नसल्याचे स्पष्ट दिसून येत आहे. तसेच एसपींच्या आदेशाला चकलांबा पोलीस ठाण्याचे प्रमुख हे केराची टोपली दाखवतात. गोदापात्रात जाऊन दुसऱ्या स्पॉटचा लोकेशन एसपींना पाठवून दिशाभूल करतात. एसपींची दिशाभूल करणारा पोलीस निरीक्षक जगात कुठेच नाही पहिला मात्र चकलांब्याच्या हद्दीत दिसत आहे. यामुळे एसपी नवनीत कॉवत यांनी चकलांबा पोलीस ठाणे प्रमुखांची सखोल चौकशी करून

पान २ वर







## अवैध व्हिडिओ गेम कमी पैशावर जास्त पैसे खेळविणाऱ्यावर छापा

बीड । प्रतिनिधी

पेठ बीड पोलीसांची अवैद्य धंद्यावर कार्यवाही – व्हिडिओ गेम, कमी पैशावर जास्त पैशे गेम खेळविणारा यांचेवर छापा मारला असता ४२,७५०/–रू.चा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. आज दि.१६/०६/२०२५ रोजी पेठ बीड पोलीस ठाणेचे पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज गोपनिय माहिती मिळाली की, मोमीनपुरा येथे एक ईसम ईलेक्ट्रोनिक साहित्याचा वापर करून व्हिडिओ गेमवर कमी पैशावर जास्त पैशाचे आमीश दाखवून लोकांना व्हिडिओ गेम खेळवित आहे. अशी खात्री लायक माहिती मिळाल्यावरून आम्ही सोबत पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज व सोबत पोह १३५३ सुभाष, पोअं/१९६० अल्ताफ, पोअं/२२१० अशपाक चालक पोह/१७५८ इम्रान यांनी आमिन मेडिकल मोमीनपुरा च्या बाजूला गेमझ् गोन नावाचा बोर्ड

पान २ वर

## पिकअप चालकाने बापलेकला उडवले

दिंद्रुड । प्रतिनिधी

बीड ते परळी रस्त्यावर अज्ञात पिकअप वाहन चालकाने स्कुटी चालवत असलेल्या इसमाला जोराची धडक दिल्याने इसमाचा मृत्यू झाला असून अज्ञात पिकअप वाहन चालकावर दिंद्रुड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेली माहिती अशी की, ५ जून रोजी रात्री ८ वाजण्याच्या सुमारास दिंद्रुड जवळ बीड ते परळी रोडवर असलेल्या संभाजी पार्क येथे एका अज्ञात पिकअप चालकाने त्याच्या ताब्यातील असलेल्या पिकअप हा निष्काळजीपणे चालवून बाबासाहेब रोजेकर रा. चाटगाव ता. धारूर व त्यांचा मुलगा गणेश रोजेकर वय १४ वर्ष हे चाटगाव येथून दिंद्रुड कडे स्कुटीवर बसून जात असताना अज्ञात पिकअप चालकाने त्यांना जोराची धडक दिली. या अपघातामध्ये बाबासाहेब रोजेकर यांचा जागीच मृत्यू झाला. तर त्यांचा मुलगा गणेश रोजेकर याला गंभीर दुखापत झाली. पिकअप चालक हा अपघात स्थळावरून पळून गेला. काल अज्ञात पिकअप चालकावर दिंद्रुड पोलीस स्टेशनमध्ये गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास दिंद्रुड पोलीस स्टेशनचे पोलीस करत आहेत.

## पत्नी, मुलाला संपवून पतीने स्वत: गळफास घेतला

### ऑनलाईन जुगारात पैसे गमावल्याने कृत्य

धाराशिव । प्रतिनिधी

आर्थिक अडचणीत आल्याने तालुक्यातील बावी येथे एका व्यक्तीने पत्नी, मुलाला संपवून स्वत: गळफास घेत जीवन संपवले. सोमवारी (दि. १६) सकाळी हा प्रकार उजेडात आला. बावी येथील लक्ष्मण मारुती जाधव (३०) हा तरुण आर्थिक अडचणीत होता. ऑनलाईन जुगार व रम्मीच्या माध्यमातून अधिक पैसे मिळविण्याच्या हव्यासाने त्याच्यावर कर्जाचा डोंगर झाला होता, अशी माहिती आहे. या नादातच त्याने त्याची काही जमीनही विकल्याचे सांगितले जात आहे. हे कर्ज डोईजड झाल्याने लक्ष्मणने हे कृत्य केल्याचा अंदाज आहे.

सोमवारी सकाळी अकरा वाजून गेले तरी घराचा दरवाजा न उघडल्याने शेजाऱ्याने अधिक चौकशी केली असता घरात लक्ष्मण, त्याची पत्नी तेजस्विनी व दोन वर्षांचा मुलगा शिवांश हे तिघेही मृतावस्थेत आढळले. लक्ष्मणने आत्महत्या करण्यापूर्वी पत्नी, मुलाला ठार मारले.

त्यांनी त्यास विष दिले की गळा दाबला हे कळू शकले नाही. घटना समजल्यानंतर पोलिस अधीक्षक रितू खोकर, उपविभागीय पोलिस अधिकारी स्वप्निल राठोड यांच्यासह ग्रामीण पोलिस ठाण्याच्या अधिकार्यांनी भेट दिली. याबाबत पोलिस अधीक्षक खोकर यांच्याशी संपर्क साधला असता त्या म्हणाल्या की, आर्थिक अडचणीत सापडल्याने या कुटुंबाने हे कृत्य केले असावे, असा अंदाज आहे.

## मोहा गावातील मोदी आवास योजनेच्या घरकुलांचे अनुदान रखडले

### माकपचे पंचायत समितीसमोर बेमुदत धरणे



परळी वैजनाथ । प्रतिनिधी

परळी तालुक्यातील मोहा येथील ग्रामस्थांच्या मोदी आवास योजनेतील घरकुलांचे अनुदान ग्रामपंचायतने पाठपुरावा करुनही गत दोन वर्षापासुन रखडलेले आहे. हे अनुदान त्वरीत द्यावे यासाठी माकपच्या वतीने परळी पंचायत समिती कार्यालयासमोर ॲड.अजय बुरांडे यांच्या नेतृत्वाखाली सोमवार दि.१६ जुनपासुन बेमुदत धरणे आंदोलन करण्यात येत आहेत.

परळी तालुक्यातील मोहा गावातील ग्रामस्थांना घरकुल मंजुरीसाठी ग्रामस्थ दि.२९ मे २०२४ पासुन पाठपुरावा करत असतानाही अद्याप या लाभार्थ्यांना घरकुलाचा पहिला हप्ता मिळालेला नाही. शासनाकडुन घरकल देण्याची मोहीम राबविली जात असतानाही मोहा गावातील पात्र लाभार्थी लाभापासून वंचित आहेत. सोमवार दि.१६ जुनपासुन माकपच्या वतीने कॉ.अजय बुरांडे यांच्या नेतृत्वाखाली प्रविण देशमुख, मदन वाघमारे, कॉ.सुदाम शिंदे, कॉ.शिवाजी पांचाळ, लक्ष्मण कोकाटे, धर्मराज कोकाटे, जगन्नाथ राजमाने, अशोक राजमाने, गोविंद शिंदे आदी ग्रामस्थ पंचायत समितीसमोर बेमुदत धरणे आंदोलन करत आहेत.

ग्रामपंचायत मोहा येथील मोदी आवास योजनेतील घरकुलांचा पहिला हप्ता मिळावा, ओबीसी कोट्यातील पात्र लाभार्थ्यांना डावलुन बोगस लाभार्थ्यांची नावे दिली त्याची चौकशी करुन दोषींवर कारवाई करावी व योग्य लाभार्थ्यांना लाभ द्यावा या मागण्या जोपर्यंत मान्य होत नाहीत तोपर्यंत आंदोलन मागे घेणार नसल्याचे कॉ.अजय बुरांडे यांनी सांगितले.

# पुरस्कार देणे म्हणजे केलेल्या कामाबद्दल कौतुकाची थाप : भास्कर पेरे पाटील

## सरपंच सौ अर्चना पाटील व अँड राज पाटील यांना पुरस्कार प्रदान

वडवणी । प्रतिनिधी

आदर्श पुरस्कार देणे म्हणजे केलेल्या कामाबद्दल शाब्बासकीची व कौतुकाची पाटीवर थाप देणे हे होय. वडवणी तालुक्यातील तिगाव येथील सरपंच सौ.अर्चना पाटील व लढा दुष्काळाशी फाउंडेशनचे संस्थापक अध्यक्ष अँड राज पाटील यांनी गावासाठी विविध विकास कामे केलेली आहे.त्यांच्या कामाची पावती म्हणून त्यांना स्वराज्य सरपंच संघ महाराष्ट्र प्रदेश यांनी बीड जिल्ह्यातून आदर्श सरपंच म्हणुन त्यांची निवड केली आहे.तालुक्यात व जिल्हाभरातील सरपंचांनी आपल्या गावासाठी चांगले उत्कृष्ट काम करावे जेणेकरून त्यांनाही पुढील काळात पुरस्कार मिळू शकतात.पुरस्कार मिळाला तर तुम्हाला गावासाठी व देशासाठी अजून चांगली कामे करण्यासाठी प्रेरणा स्फूर्ती नक्कीच मिळेल असे गोरोदगार आदर्श सरपंच भास्करराव पेरे पाटील यांनी व्यक्त केले.

स्वराज्य सरपंच संघ महाराष्ट्र प्रदेश यांच्या वतीने आदर्श सरपंच सन्मान सोहळा २०२५ राज्यस्तरीय पुरस्कार सोहळा, सन्मान सरपंचाचा गावच्या मुख्यमंत्र्याचा,या कार्यक्रमात बीड जिल्ह्यासह राज्यात वृक्ष लागवड चळवळीचे जनक ओळख असणारे अँड. राज पाटील यांना वृक्ष संवर्धन मित्र म्हणून तर तिगावच्या ऊच्च शिक्षीत समपंच अर्चनाताई पाटील यांना आदर्श सरपंच म्हणून पुरस्कार रविवार दि १५ रोजी माता अहिल्या नगरीत विविध मान्यवरांच्या उपस्थितीत शाल श्रीफळ व स्मृतिचिन्ह देऊन सन्मानित करण्यात आले. अहिल्यानगर येथील स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र प्रदेश स्तरावरील संस्था असून गेल्या अनेक वर्षांपासून विविध क्षेत्रात उल्लेखनीय कामगिरी करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरव करते. तर यावर्षीचा आदर्श सरपंच म्हणून वडवणी तालुक्यातील तिगांवच्या कर्तव्यदक्ष आदर्श सरपंच सौ. अर्चनाताई राज पाटील यांना घोषित करण्यात आला आहे. तर त्यांचे पती समाजसेवक व लढा दुष्काळाशी या फाउंडेशनचे सर्वासर्वे संस्थापकीय अध्यक्ष अँड. राज पाटील हे देखील गेल्या अनेक वर्षांपासून बीड जिल्ह्यासह महाराष्ट्रात वृक्ष लागवडीच्या माध्यमातून सामाजिक कार्य करत आहेत.



लोक सहभागातुन जलयुक्त शिवार कार्यक्रमांतर्गत नदी खोलीकरण रुंदीकरण पाणी आडवा पाणी जिरवा या मधून गाव दुष्काळ मुक्त व टँकर मुक्त होणार आहे.याच कार्याची दखल घेऊन स्वराज्य सरपंच सेवा संघ महाराष्ट्र राज्य यांच्या वतीने रविवार दिनांक १५ जून वार रविवार रोजी अहिल्यानगर येथील माऊली संकुलन सभागृह येथे पाटोदा गावचे आदर्श सरपंच भास्कर पेरे पाटील यांच्या हस्ते तीगांवच्या पाटील दाम्पत्यांचे यथोचित सत्कार करून स्मृतिचिन्ह देत सन्मानित करण्यात आले आहे. सर्व सन्माननीय पदाधिकारी सरपंच सेवा संघ यांच्या सहकार्याने पार पडला.

> गावातील विविध विकास कामे करण्यासाठी गाव आदर्श करण्यासाठी गावातील सर्वांचे सहकार्याचे आवश्यकता असते ते माझ्या गावातील लहान थोर महीला पुरुष तरुण युवक सर्वांनी सहकार्य केलेले आहे. हा पुरस्कार मिळाल्याने गावचा विकास करण्यासाठी नवीन ऊर्जा प्राप्त झालेली आहे. एवढ्यावरच न थांबता पुढे जास्तीत जास्त विकास कामे करायचे आहेत.
>
> **– अँड. राज पाटील** (लढा दुष्काळाशी फाउंडेशन संस्थापक अध्यक्ष)



## बीड ते पंढरपूर आषाढी वारी दिव्यरथ पालखी सोहळा

बीड । प्रतिनिधी

संतश्रेष्ठ श्री ज्ञानेश्वर माऊली आळंदी देवाची यांचे आजोबा ब्रह्मलीन गोविंद पंत महाराज यांचा आषाढी दिव्यरथ पालखी सोहळा दिनांक २५ जून २०२५ बुधवारी रोजी बीडहून प्रस्थान करणार आहे

हा आषाढी पायी वारी पालखी सोहळा मजल दर मजल करत श्रीक्षेत्र पंढरपूर कडे मार्गक्रमण करत हरिनामाच्या गजरात व पांडुरंगाच्या भक्तीत तल्लीन होऊन भाविक भक्त सहभागी होणार आहेत. प्रत्येक मुक्कामाच्या ठिकाणी रात्री हरी जागर व किर्तन सेवा संपन्न होणार आहे. आषाढी वारी निमित्त या पायी वारी सोहळ्यामध्ये जास्तीत जास्त संख्येने भाविक भक्तांनी सहभागी होऊन वारीचा आनंद घ्यावा व या पायीवारी पालखी सोहळ्यात सहभागी व्हावे असे आवाहन संस्थांचे अध्यक्ष व दिंडी प्रमुख हभप सुग्रीव महाराज डाके, श्रीमंत (अण्णा) वाघमारे, ह भ प राधाकृष्ण वाव्हळ महाराज यांनी कळविले आहे.

या दिव्य रथ पालखी सोहळ्याचे पंढरपूर येथील मुक्कामाचे ठिकाण आहे दिनकरराव (सरपंच) चव्हाण यांचा मळा श्रीक्षेत्र पंढरपूर. ज्या भाविक भक्तांना या आषाढी पालखी सोहळ्यामध्ये सहभागी व्हायचे आहे त्यांनी खालील नंबर वर संपर्क करावा असे सुग्रीव महाराज डाके कळवतात.

## परळी शहरातील उदगीरकर व डुबे कुटुंबीयांचे धनंजय मुंडे यांनी केले सांत्वन

परळी वैद्यनाथ । प्रतिनिधी

राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे नेते, माजी मंत्री आमदार धनंजय मुंडे यांनी आज परळी वैद्यनाथ शहरातील उदगीरकर व डुबे कुटुंबीयांची भेट घेऊन त्यांचे सांत्वन केले.

शहरातील प्रसिद्ध व जुने व्यापारी शंकर अप्पा उदगीरकर यांचे नुकतेच निधन झाले होते, त्याचप्रमाणे प्रसिद्ध व्यापारी भगवानराव डुबे यांचेही अल्पशा आजाराने निधन झाले होते. या दोन्ही कुटुंबीयांची धनंजय मुंडे यांनी आज भेट घेऊन त्यांच्या कुटुंबियांच्या सोबतच्या आठवणींना उजाळा देत मृतात्म्यांना श्रद्धांजली अर्पण करुन कुटुंबीयांचे सांत्वन केले. यावेळी राष्ट्रवादी काँग्रेसचे तालुकाध्यक्ष वैजनाथराव सोळंके, शहराध्यक्ष बाजीराव भैय्या धर्माधिकारी, जयपाल लाहोटी, चेतन सौंदळे, कुमार व्यवहारे, शंकर कापसे यांसह पदाधिकारी आदी उपस्थित होते.

## भगवानगडाचे मठाधिपती डॉ. नामदेवशास्त्री महाराज यांच्याकडून आंधळे कुटुंबियांचे सांत्वन

बीड । प्रतिनिधी

भगवानगडाचे महंत डॉ. नामदेव शास्त्री महाराज यांनी सोमवार दि.१६ जून रोजी माजी जिल्हा आरोग्य अधिकारी डॉ.कमलाकर आंधळे यांच्या निधनामुळे त्यांच्या बीड येथील निवासस्थानी भेट देऊन डॉक्टर आंधळे कुटुंबीयांचे सांत्वन केले.

बीड तालुक्यातील हिंगणी येथील मुळचे रहिवासी असलेले स्व.डॉ. कमलाकर आंधळे यांचे कुटुंबीय हे वारकरी संप्रदाय आणि संत भगवान बाबा यांच्यावर नितांत श्रध्दा असलेले कुटूंब आहे. यावेळी आंधळे कुटुंबीय, संत भगवानबाबा आणि भगवानगड



यांच्या आठवणीला महंत डॉ. नामदेवशास्त्री महाराज, डॉ. सुधाकर आंधळे, कपिल आंधळे आणि त्यांची बहीण यांनी उजाळा दिला. यावेळी आंधळे कुटुंबीय व नातेवाईक उपस्थित होते. दरम्यान माजी मंत्री काँग्रेसचे ज्येष्ठ नेते अशोक पाटील, आरोग्य उपसंचालक डॉ. राधाकृष्ण पवार, माजी जिल्हा शल्यचिकित्सक अशोक थोरात, सुरेश साबळे आदी वैद्यकीय, सामाजिक आणि राजकीय क्षेत्रातील मान्यवरांनी आंधळे परिवाराची भेट घेऊन सांत्वन केले.

## वैद्यनाथ महाविद्यालय प्राचार्यपदी डॉ.जगतकर

परळी वैजनाथ । प्रतिनिधी

जवाहर शिक्षण संस्थेच्या वैद्यनाथ कॉलेजमध्ये प्राणीशास्त्र विभाग प्रमुख, डॉ. जे. व्ही जगतकर यांची नियुक्ती सेवाजेष्ठता नुसार संस्था व विद्यापीठाने केली आहे. डॉ जे व्ही जगतकर यांना शिक्षण क्षेत्रातील व प्रशासकीय क्षेत्रातील प्रदीर्घ अनुभव आहे. त्याचबरोबर राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय क्षेत्रात विविध परिषदा, शोध निबंधाचे वाचन त्यांनी केलेले आहे. त्यांनी केलेल्या कार्यामुळे व प्रदीर्घ अनुभवामुळे संस्थेने त्यांची प्राचार्य पदी नियुक्ती केलेली आहे. या निवडीबद्दल महाराष्ट्र राज्याच्या पर्यावरण मंत्री ना. पंकजाताई गोपीनाथराव मुंडे, परळी



विधानसभा मतदारसंघाचे आमदार श्री धनंजय मुंडे, जवहार शिक्षण संस्थेचे सचिव श्री दत्ताप्पा इटके यांच्यासह संस्थेचे सर्व पदाधिकारी व संचालक मंडळ यांनी प्राचार्य डॉ. जे व्ही जगतकर यांचे अभिनंदन केले आहे. त्याचबरोबर महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक व शिक्षकेत्तर कर्मचारी यांनी डॉ. जे व्ही जगतकर यांचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

## अन्यायकारक फीस वाढीविरोधात एआयएसएफचा आवाज बुलंद

बीड । प्रतिनिधी

ऑल इंडिया स्टुडंट फेडरेशन बीड जिल्हा समितीच्या वतीने आज मा.जिल्हाधिकारी कार्यालयात व मा. शिक्षणाधिकारी जिल्हा शिक्षण विभाग बीड येथे दि. १६ जून २०२५ या दिवशी निवेदन देण्यात आले. ज्यात शाळांमध्ये सुरू असलेली अन्यायकारक व मनमानी पद्धतीने वाढवण्यात आलेली फी तत्काळ मागे घेण्याची मागणी करण्यात आली.

AISF च्या कार्यकर्त्यांनी शाळांच्या व्यावसायिकरणाविरोधात जोरदार घोषणाबाजी करत, विद्यार्थ्यांच्या पालकांवरील आर्थिक ओझं वाढवणाऱ्या या धोरणाचा तीव्र निषेध व्यक्त केला. निवेदनाद्वारे त्यांनी शासनाच्या शिक्षण धोरणावर प्रश्नचिन्ह उपस्थित करत, शिक्षण हे अधिकार असून, त्याचा बाजार मांडू नये, अशी भूमिका मांडली. राज्य कौन्सिलर जगताप विनायक, राज्य कौन्सिलर जाणव्ही हुरकुडे, योगेश वाघमारे व जगताप कृष्ण सुधीर आपरे विकास जगताप विद्यार्थ्यांचे पालक म्हणून उत्तरेश्वर सपाटे यांनी सांगितले की, शासनाने आरटीई कायद्याअंतर्गत सर्व विद्यार्थ्यांना समतामूलक व मोफत शिक्षण देण्याचे आश्वासन दिले होते. मात्र प्रत्यक्षात खासगी शाळा फीच्या नावाखाली लुट करत आहेत. गरिबांच्या लेकरांना शिक्षणाच्या अधिकारापासून वंचित ठेवले जात आहे. विशेष म्हणजे ज्यावेळेस आम्ही शिक्षण अधिकारी यांना निवेदन देण्यास गेलो त्यावेळेस त्यांनी दबाव टाकून आम्हास निवेदन देतानाचा फोटो काढून दिलेला नाही. ही दाब दडपशाहीची क्रती बरोबर नाही. याचा तीव्र निषेध आम्ही करतो.

निवेदनात पुढील मागण्या करण्यात आल्या आहेत. सर्व शाळांनी वाढवलेली फीस तत्काळ मागे घ्यावी. शालेय शिक्षण विभागाने फी संरचनेवर नियंत्रण ठेवण्यासाठी स्वतंत्र यंत्रणा उभी करावी. गरजू विद्यार्थ्यांसाठी शिष्यवृत्ती योजना प्रभावीपणे राबवावी. शाळांवर आर्थिक ऑडिट व पारदर्शकता अनिवार्य करावी. यावेळी –खडक्र चे कार्यकर्ते, विद्यार्थी व पालक मोठ्या संख्येने उपस्थित होते. निवेदन प्रशासनाकडे सादर करून जर शासनाने लवकर निर्णय घेतला नाही, तर जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा देखील देण्यात आला.

## ग्रामपंचायतींना 'ग्रामकृषी समिती'चा विसर

### शासनाच्या उद्देशाला फासला हरताळ; शेती उत्पादनावर होणार परिणाम

पात्रुड । प्रतिनिधी

राज्य ग्रामपंचायत अधिनियमानुसार प्रत्येक गावात ग्रामपंचायतीमध्ये ग्रामकृषी विकास समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना गावातच कृषीविषयक योजनांची माहिती व मार्गदर्शनासाठी ग्रामकृषी विकास समिती स्थापन करण्यात आली आहे. या समितीच्या मार्गदर्शनाचा लाभ किती शेतकऱ्यांना झाला, हा संशोधनाचा विषय असून, या समित्या कागदोपत्रीच असल्याचे समोर आले आहे. विशेष म्हणजे, बहुतांश शेतकऱ्यांना तर ग्रामकृषी विकास समिती असते, हेदेखील माहिती नसल्याचे प्रत्यक्ष शेतकऱ्यांची भेट घेतली असता निदर्शनास आले आहे.

शेतीच्या सर्वांगीण विकासासाठी, गावातील नैसर्गिक साधनसंपत्तीचा विनियोग करण्यासाठी शेतकऱ्यांच्या विविध योजना व प्रकल्पामधून हाती घ्यावयाच्या कामांचा प्राधान्यक्रम ठरवण्यासाठी, राज्य ग्रामपंचायत अधिनियमानुसार प्रत्येक गावात ग्रामपंचायतीमध्ये ग्रामकृषी विकास समितीच्या माध्यमातून शेतकऱ्यांना गावातच कृषिविषयक योजनांची माहिती व मार्गदर्शन मिळावे, यासाठी शासनाच्या निर्देशानुसार राज्यातील प्रत्येक ग्रामपंचायतीमध्ये ग्रामकृषी विकास समिती स्थापन करण्यात आली. बीड जिल्ह्यातील ग्रामपंचायतींमध्ये १४ सदस्यीय ग्रामकृषी विकास समिती स्थापन करण्यात आली आहे का, हा प्रश्न अजूनही अनुत्तरीत आहे. शासनामार्फत संचालित विविध कृषिविषयक योजना व उपक्रमांची माहिती या समित्यांमार्फत शेतकऱ्यांना मिळावी, हवामानातील बदल, निसर्गाचा अनियमितपणा, पर्जन्यमान, कीडरोग, सुधारित जातींची बियाणे उपलब्ध न होणे आदींवर शेतकऱ्यांना मार्गदर्शन करण्यासाठी शासनाने ग्रामकृषी ग्रामपंचायतीमध्ये स्थापन करण्याचा निर्णय शासनाने घेण्यात आल्याचे सांगण्यात येते. विकास समिती प्रत्येक कृषी सहाय्यकाच्या समन्वयाने ग्रामसेवकांनी प्रत्येक महिन्यातून किमान एक सभा घेणे आवश्यक आहे. मात्र, केवळ औपचारिकता म्हणून या समित्या स्थापन करण्यात आल्या. बहुतांश शेतकऱ्यांना या समितीविषयी माहितीच नसल्याचे वास्तव पुढे आले आहे.

**ग्रामकृषी समितीत यांचा सहभाग**

ग्रामकृषी विकास समिती ही १४ सदस्य असलेली समिती आहे. यात सरपंच समितीचे पदसिद्ध अध्यक्ष राहतात. ग्रामसेवक, ग्रामविकास अधिकारी सदस्य सचिव, तर कृषी सहाय्यक सहसचिव असतात. शिवाय ग्रामपंचायत उपसरपंच सदस्यांसह तीन प्रगतशील शेतकरी, त्यामध्ये एक महिला, विविध कार्यकारी सहकारी संस्थांचे अध्यक्ष, शेतकरी उत्पादक कंपनी किंवा शेतकरी गटांचा एक प्रतिनिधी, महिला बचतगटाचा एक प्रतिनिधी, कृषिपूरक व्यवसायातील दोन शेतकरी आणि तलाठी अशा १४ प्रतिनिधींचा समावेश समितीत करण्यात आला आहे. मात्र, या समित्या कुठेच कार्यरत दिसून येत नाही.

## सेवानिवृत्त ज्येष्ठ नागरिक संघटनेतर्फे सत्कार

### ७० वर्षे जनता जनार्दनाची सेवा करता आली याचा मनस्वी आनंद : माजी मंत्री पंडित

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात आपण ७० वर्षे समाजकारण आणि राजकारण केले. गेवराई तालुक्यातील जनतेसह जिल्ह्यातील जनतेची मनोभावे सेवा केली. गेवराई तालुक्यातील जनतेसाठी विविध विकासाची कामे करता आली याचा मनस्वी आनंद आहे. परमेश्वराच्या कृपेने आणि जनता जनार्दनाच्या आशीर्वादाने आपल्याला खूप मिळाले. जनतेची सेवा करण्याची संधी मिळाल्याचा आनंद आपल्याला आहे. सध्याचे राजकीय वातावरण दूषित झाले आहे. जातिवाद मोठ्या प्रमाणात वाढला आहे. सामाजिक स्वास्थ सुधारण्यासाठी राजकारणासह सर्वांनीच प्रयत्न करायला हवेत, असे प्रतिपादन माजीमंत्री तथा बीड जिल्ह्यातील राजकीय भीष्माचार्य शिवाजीराव दादा पंडित यांनी केले. बीड येथे राष्ट्रमाता जिजाऊ प्रबोधन मंडळ व



सेवानिवृत्त जेष्ठ नागरिक संघटनेच्या वतीने शिवाजीराव पंडित यांचा सोमवार दिनांक १६ जून रोजी सत्कार करण्यात आला. या प्रसंगी शिवाजीराव दादा पंडित बोलत होते.

यावेळी बोलताना माजी मंत्री शिवाजीराव दादा पंडित म्हणाले, महाराष्ट्राचे भाग्यविधाते आमचे राजकीय गुरू स्वर्गीय यशवंतराव चव्हाण यांच्यासारख्या दिग्गज राजकीय मार्गदर्शकांच्या नेतृत्वाखाली आम्ही राजकारण आणि समाजकारण केले. ७० वर्ष गोरगरीब जनतेचे सेवा केली. गेवराई तालुक्याचा सर्वांगीण विकास करण्याचा प्रयत्न केला. आजचे राजकीय वातावरण दूषित झाले आहे. लोकांच्या अपेक्षा वाढल्या आहेत. राजकारणात जातीयवाद वाढला. जाती जातीमध्ये वाद वाढला आहे. ही उपस्थिती सुधारण्याची आज गरज निर्माण झाली आहे.

गेवराई तालुक्यात केंद्रीय नवोदय विद्यालय आणले. शिक्षण संस्थेच्या माध्यमातून शाळा, कॉलेज, आणि विविध शैक्षणिक संस्था, सहकारी संस्थांच्या माध्यमातून विकास साधण्याचा प्रयत्न केला. तालुक्यात सहकारी साखर कारखाना व्हावा, यासाठी त्याकाळी आमदारकी लढविली नाही. माजी उपमुख्यमंत्री मंत्री स्वर्गीय सुंदरराव सोळंके यांना यावेळी बिनविरोध आमदार केले. आमदार होताच आठ दिवसात कारखान्याला मंजुरी आली होती, याची आठवणही त्यांनी यावेळी करून दिली. गेल्या ७० वर्षातील राजकारणातील आणि समाजकारणातील विविध आठवणी त्यांनी याप्रसंगी सांगितल्या.

यावेळी प्रा. मुकुंद काळे, पत्रकार नागरे नाना, नारायण हाडोळे आदींनी आदरणीय दादांच्या कार्याविषयी मनोगत व्यक्त करून गौरवोद्गार काढले. यावेळी उपस्थित सर्वांनी दादांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या. या कार्यक्रमास हरिश्चंद्र चव्हाण, राजाभाऊ हाडे, रमेश बुरंगे, सीताराम मुळे, राजाभाऊ कुटे, पिंपळे, डावकर, शिवाजी गुंजाळ, सुरवसे, राजापुरे, शिवाजी देसाई आदींची उपस्थिती होती. कार्यक्रमाचे प्रास्ताविक व आभार साहित्यिक दादासाहेब सादोळकर यांनी केले.

पान १ वरून...

## एसपी साहेब, तुमची दिशाभूल करणाऱ्या पोलीस निरीक्षक संदीप पाटीलवर कारवाई

आतापर्यंत केलेल्या कारवायांचा अहवाल मागून त्याप्रमाणे कारवाई करून तातडीने त्यांची बदली करावी अशी मागणी होत आहे. एवढेच नव्हे तर चकलांबा पोलीस ठाण्यातील एक दोन पोलीस कर्मचारी गोदापात्रात राजरोजपणे फिरत असतात. हे कर्मचारी कशासाठी फिरतात याची माहिती पोलीस अधिक्षकांनी गुप्त पद्धतीने घेऊन यांना फिरायला लावणारे अधिकारी, कर्मचारी कोण याची माहिती घ्यावी आणि कारवाई करणे गरजेचे आहे.

## अवैध व्हिडिओ गेम कमी पैशावर जास्त पैसे खेळविणाऱ्यावर छापा

असणा–या गाळयामध्ये छापा टाकला असता वर नमूद वर्णनाचे इलेक्ट्रानिक गेमचे साहित्य व्हिडिओ गेम चालविणारा शेख इम्रान शेख दस्तगीर वय २८ वर्षे रा. मोमीनपुरा हा जागीच मिळून आला व गेम खेळणारे लोक आम्हा पोलीस पार्टीस पाहून पळून गेल्याने पोलीस स्टेशन पेठ बीड येथे गु.र.नं. १७१/२०२५ कलम १२ (अ) महाराष्ट्र जुगार प्रतिबंधक कायदया प्रमाणे गुन्हा नोंद करून आरोपी च्या ताब्यातील व्हिडिओ गेमचे साहित्य व रोख रक्कम असा एकूण एकूण ४२,७५०/– रूपायाचा मुद्देमाल जप्त करण्यात आला.

सदरची कार्यवाही पोलीस अधीक्षक नवनीत काँवत साहेब, अप्पर पोलीस अधीक्षक सचिन पांडकर, उपविभागीय पोलीस अधीकारी यांचे नेतृत्वाखाली मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक अशोक मुदिराज, पोह १३५३ सुभाष, पोअं/१९६० अल्ताफ, पोअं/२२१० अशपाक, चालक पोह/१७५८ इम्रान सर्व नेमणूक पोलीस स्टेशन पेठ बीड यांनी पार पाडली.

# महावितरण विरोधात क्रांतिकारी लाईन स्टाफ सेना धरणे आंदोलन करणार

बीड । प्रतिनिधी

महावितरण विभागातील कर्मचारीवर झालेल्या अन्याविरोधात क्रांतिकारी लाईन स्टाफ सेना मार्फत धरणे आंदोलन पुकारले आहे. त्यामध्ये पत्रातील केलेल्या उल्लेखा नुसार निलंबीत श्री. लहु योगीराज वाघमारे, वरिष्ठ तंत्रज्ञ, (भ.नि.नि.क्र. ७१०६७६) यांच्यावर केलेली निलंबन कार्यवाही कंपनी नियमानुसार योग्य आहे, परंतु संघटनेने या प्रकरणाविषयी कोर्टमार्फत व महावितरणच्या हेड ऑफीसधील सांघिक कार्यालयामार्फत चौकशी केली असता असे निष्पन्न झालं की आपण कंपनीच्या एक सक्षम अधिकारी पदावर असुन सुद्धा सदरील प्रकरणातील कार्यवाहीत आपल्या लाईन स्टाफला त्याचे म्हणणे मांडण्यासाठी कुठलाही कालावधी, कोणतीही कांझ नोटीस अथवा दोषारोप पत्र न देता इतर दोषी अधिकारी कर्मचारी यांना पुरेपुर वाचविण्यासाठी कंपनीचे नियम धाब्यावर ठेवून केलेली तडकाफडकी निलंबनाची कार्यवाही आहे सदर कार्यवाहीतील कर्मचारीवर केलेले आरोप हे चुकीचं असून सदर कर्मचारी हा दोषी नसुन सदरील ठिकाणी कार्यरत नसतानाही यावर अन्यायकारक निलंबनासारखी कार्यवाही करण्यात आलेली आहे.



सदरील कार्मचारी स्वत. वर झालेली अन्याय दूर करण्यासाठी आपल्या दालना समोर दि.६/६/२५ रोजी आमरण उपोषणास बसला होता. सदरील उपोष्णादरम्यान आपण कार्यालयामार्फत कर्मचारी यास सांगण्यात आले की आपल्यावर झालेला अन्याय दूर करून योग्य तो न्याय लवकरात लवकर दिला जाईल, असे आश्वासन देऊन सदर आपण हे मागे घण्यास सांगितले तरी आपल्या विनंतीस मान देऊन कर्मचारी यांनी आपले चालू असलेले उपोषण हे तात्पुरते स्थगित केलेले आहे. संघटनेने ही आपल्या सोबत वेळोवेळी चर्चा करून प्रशासनास सहकार्य केलेले आहे. तरी अद्याप आपल्या कार्यालयामार्फत सदर प्रकरणात कोणतीही ठोस कार्यवाही झालेली दिसून येत नाही व सदर कर्मचारी यांच्यावर झालेला अन्याय संघटनेस मान्य नसल्याने संघटना दिलेल्या तारखेस आंदोलन करण्यावर ठाम आहे. तरी संघटनेने पुकारलेले धरणे आंदोलन १८. ६. २५ रोजीच आपल्या दालनासमोर करण्यात येईल तसेच हे विभागीय कार्यालया समोरील आंदोलन असुन सदर प्रकरणात लवकरात लवकर न्याय न मिळाल्यास लातुर परिमंडळ कार्यालय व मराठवाडा प्रादेशिक छत्रपती संभाजी नगर कार्यालय या ठिकाणी ही आंदोलन करण्यास संघटना कटीबद्ध राहील.

सदर आंदोलनादरम्यान औद्योगिक शांतता सुव्यवस्था भंग झाल्यास यास आपले कार्यालय सर्वस्वी जबाबदार राहील. तरी आपणास विनंती की, सदर प्रकरणातील झालेला कामगारावरील अन्याय दूर करून प्रकरण लवकरात लवकर निकाली काढुन संघटनेस सहकार्य करावे, असे आवाहन क्रांतिकारी लाईन स्टाफ सेना तर्फे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे.

# जि.प. माध्यमिक शाळेत प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

चौसाळा । प्रतिनिधी

चौसाळा येथील जिल्हा परिषद माध्यमिक शाळेत नवीन शैक्षणिक वर्ष निमित्त प्रवेशोत्सव कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये सर्वप्रथम शाळेला भेटी देण्यासाठी आलेल्या प्रमुख पाहुण्यांचे स्वागत स्काऊट गाईड व क्रीडाशिक्षक श्री आनंद वाघमारे व प्रशांत वायभट यांच्या नेतृत्वाखाली स्काऊट गाईड पथकातील विद्यार्थ्यांनी प्रमुख पाहुण्यांना सलामी दिली. त्यानंतर नवीन प्रवेश घेतलेल्या विद्यार्थ्यांची बैलगाडीतून गावात प्रवेश फेरी काढण्यात आली. प्रवेश फेरी आल्यानंतर शाळेतील बालगंधर्व सांस्कृतिक सभागृह येथे कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले.

प्रवेश उत्सव कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती व सावित्रीबाई फुले यांच्या प्रतिमेचे प्रमुख पाहुण्याचे हस्ते पूजन करून कार्यक्रमाची सुरुवात करण्यात आली. यावेळी प्रमुख पाहुण्याच्या हस्ते विद्यार्थ्यांना पुस्तक, शालेय गणवेश व बूट सॉक्स देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन सांस्कृतिक विभाग प्रमुख श्री लक्ष्मण राऊत यांनी केले. या कार्यक्रमासाठी मुख्य कार्यकारी अधिकारी वासुदेव सोळुंके साहेब, प्राथमिक शिक्षणाधिकारी भगवानराव फुलारे साहेब, उपशिक्षणाधिकारी भगवानराव



सोनवणे साहेब, बीडच्या विस्तार अधिकारी प्रणिता गंगाखेडकर मॅडम, सर्व शिक्षा अभियानाचे जिल्हा समन्वयक राहुल चाटे सर, विषय तंज्ञ मोरे साहेब, शाळेचे मुख्याध्यापक सुभाष काकड सर, माजी मुख्याध्यापिका श्रीमती पद्मजा हम्पे मैडम, शालेय व्यवस्थापन समितीचे अध्यक्ष विनोदजी शिंदे, शालेय व्यवस्थापन समितीचे सदस्य विष्णू कळासे, ग्रामपंचायत सदस्य विकास नाईकवाडे, ग्रामपंचायत सदस्य किशोर ढोकणे, शिक्षण प्रेमी प्रसाद देशमुख सर्व शिक्षक शिक्षिका इतर कर्मचारी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे आभार प्रदर्शन श्री ज्ञानेश्वर म्हस्के यांनी केले.



बीड शहरातील दिलावर नगर भागात हाफिज मन्सूर तय्यबी यांचा निवासस्थान बीड शाहीन ऐकडमी मधील विद्यार्थीनी ५८६ माक्से NEET मध्य धेउन सेंकड टोपर उत्तीण झाल्याबदल अल्मा जमा सैयद आसद साहब यांचा सत्कार करूण पुढील वाटचालिस शुभेच्छा देताना हाफिज मन्सुर, तय्यबी साजद, सय्यद सलीम, नबिल जमा, शोयब ईनामदार, शेख कदीर भाई, इस्माइल साहब, मूजतबा खान सर, शेख ऐजाज, दस्तगीर साहब फजलु व सहकारी उपस्थित होते.

# डुकडेगावच्या ऊसतोड मजुराचा मुलगा सीईटी परीक्षेत ९५% मार्क झाला पास

वडवणी । प्रतिनिधी



हालाखीची परिस्थिती आणि ऊसतोड मजूर असलेल्या आई–वडिलांची मेहनत व कष्ट पाहून मुलालाही वाईट वाटलं असेल त्यामुळेच कदाचित ऊसतोड आई–वडिलांना कामाला हातभार लावत स्वत:ही स्वत:ला शिक्षणात झोकून दिले यांचा आदर्श डोळ्यासमोर ठेवून एम एस सी आय टी ९५ टक्के गुण मिळवून ऊसतोडाचा मुलगा मजूर झाला ही खरंच बाब कौतुकाची आहे.

वडवणी तालुक्यातील दुकडेगाव या एका खेड्या गावातील ऊसतोड मजुरांचा मुलगा अनिकेत अंकुश आवाड अनिकेतने आपले आई वडील ऊसतोडीसाठी जाऊन रात्रंदिवस काम करून आपल्या शिक्षणासाठी लावलेला पैसा किती मेहनतीचा असतो तो त्याने या MH-CET या परीक्षेत ९५% मार्क घेऊन आपल्या आई वडिलांचे स्वप्न पूर्ण केले उत्तीर्ण झाला आहे.




राष्ट्रमाता, राजमाता माँसाहेब जिजाऊ यांच्या ३५१ व्या स्मृतिदिनी अभिवादन करताना महामानव अभिवादन ग्रुप बीड

# आज शाळेच्या पहिल्या दिवशी जि प प्रा शा दैठणा बु. येथे प्रवेशोत्सव उत्साहात साजरा

परतूर । प्रतिनिधी

इयत्ता पहिलीत नव्याने प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची सजवलेल्या बैलगाडीतून गावातून मिरवणूक करण्यात आली. यावेळी विद्यार्थ्यांच्या हातात प्रवेशोत्सवाचे फलक होते. चिमुकल्यांच्या बैलगाडीचे सारथ्य गावचे प्रथम नागरिक, सरपंच श्री शत्रुघ्न भय्या कणसे यांनी स्वत: केले.

मिरवणुकीनंतर शाळेत नवागत विद्यार्थ्यांचे हार, पुष्प व चॉकलेट देऊन स्वागत करण्यात आले. तसेच यावर्षीपासून इयत्ता सातवीचा वर्ग ही शाळेत नव्याने सुरू करण्यात आला. तसेच शाळेच्या पहिल्याच दिवशी सर्व




विद्यार्थ्यांना उपस्थित मा.सरपंच, अध्यक्ष, उपाध्यक्ष, केंद्रप्रमुख श्री थोटे सर, ग्रा.प. सदस्य, सदस्य, पालक, नागरिक यांच्या हस्ते मोफत पाठ्यपुस्तके, मोफत गणवेश, टाय व मोफत बूट सॉक्स चे वाटप करण्यात आले. याप्रसंगी मा सरपंचांनी शुभेच्छा मनोगत व्यक्त केले. शिक्षणप्रेमी नागरिक व पालक श्री अप्पा बेरगुडे यांनी पेरणीचे दिवस असूनही बैलगाडी उपलब्ध करून बैल व बैलगाडीस सजवून सहकार्य केले.

उपस्थितांचे आभार व्यक्त करून शाळेच्या पहिल्या दिवशी गोड खीर मेनूद्वारे विद्यार्थ्यांचे तोंड गोड करण्यात आले. आजच्या कार्यक्रमास अध्यक्ष सर्वश्री पुंजाराम कणसे, बंडूभाऊ रेपे, माजी अध्यक्ष विठ्ठल नरवडे, परमेश्वर रेपे, उपाध्यक्ष संतोष रेपे, सदस्य भागवत कवडे, अशोक बेरगुडे, गोवर्धन नवल, रावसाहेब चव्हाण, श्याम महाराज चव्हाण, श्रीराम मोरे, श्री अप्पा बेरगुडे, भागवत कोकाटे, रामा बेरगुडे, सोनगुडे, कवडे, भैया शेख, भोनजी घोडे, पालक व नागरिक उपस्थित होते.

# मिल्लीया माध्यमिक शाळा धारूर येथे पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांचे स्वागत

धारूर । प्रतिनिधी

अंजुमन ईशात ए तालीम बीड संचालित मिल्लीया माध्यमिक शाळा धारूर येथे १६ जून सोमवारी शाळेच्या पहिल्या दिवशी विध्यर्थ्यांना फुले देऊन सत्कार करण्यात आले. या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी शाळेचे मुख्याध्यापक काजी जैनुल आंबेदिन सर होते तर प्रमुख पाहुणे मध्ये पालक वर्ग उपस्थित होते.



कार्यक्रम ची सुरुवात पवित्र कुराण पठण करून झाली त्या नंतर नात पठाण करण्यात आले होते. कार्यक्रमात विध्यार्थना साहित्य टिफिन, पाणी बॉटल, कॅम्पस बॉक्स देण्यात आले. तसेच पुस्तके ही वाटप करण्यात आले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कामराम सर यांनी केले तर आभार प्रदर्शन अयाज कागजी सर यांनी केले. या वेळी वाजेद सर, फेरोज सर, मजेद सर, नजीर सर, रेहान सर, इंजमाम सर, मसरत बाजी,फरहीन बाजी, हुमेरा बाजी, आदिल चाऊस, शेख मुबीन उपस्थित होते.

# भारतीय माध्यम क्षेत्र अधिक सक्षम झाले पाहिजे : मंत्री अतुल सावे

## राज्यकर्ते आणि प्रसार माध्यम यांचे संबंध आंबटगोड असले तरच लोकशाही टिकून राहील – राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे

छत्रपती संभाजीनगर । प्रतिनिधी

मराठवाड्याचे विभागीय केंद्र असलेल्या छत्रपती संभाजीनगर येथे ज्या प्रकारे सर्व शासकिय कार्यालये आहेत.त्याच पध्दतीचे एक विभागीय पत्रकार भवन बांधण्या साठी शासन जागा उपलब्ध करुन देईल आणि ते बांधून देण्या साठी आम्ही प्रयत्न करू असे आश्वासन राज्याचे सामाजिक न्यायमंत्री तथा संभाजी नगरचे पालकमंत्री संजय शिरसाट यांनी दिले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबईच्या मराठवाडा विभागाच्या वतीने संत एकनाथ रंगमंदिर येथे झालेल्या भव्य दिव्य अशा रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशनामध्ये सामाजिक न्यायमंत्री संजय शिरसाट यांनी ही महत्वपुर्ण घोषणा केली तर पत्रकारांनी केलेले वार्तांकन वाचकांच्या ज्ञानात नेहमीच भर घालणारे असल्याने भारतीय माध्यम क्षेत्र अधिक सक्षम झाले पाहिजे अशी अपेक्षा मंत्री अतुल सावे यांनी व्यक्त केली तर राज्यकर्ते आणि प्रसार माध्यम यांचे संबंध जर आंबटगोड असले तरच खऱ्याअर्थाने लोकशाही टिकून राहील असे परखड मत पत्रकार संघटनेचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे यांनी व्यक्त केले. आणि पत्रकारांना आधार देण्यासाठीच महाराष्ट्र राज्य पत्रकार संघटना कार्यरत असल्याचे मत पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष तथा प्रदेश संघटक संजय भोकरे यांनी व्यक्त केले.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे रौप्य महोत्सवी विभागीय अधिवेशन छत्रपती संभाजी नगर येथील संत एकनाथ रंगमंदिर उस्मानपुरा येथे रविवार दिनांक १५ जून २०२५ रोजी थाटामाटात संपन्न झाले.या अधिवेशनाच्या पहिल्या सत्रातील परिसंवादाचे उद्घाटन इतर मागास बहुजन कल्याण मंत्री अतुल सावे यांच्या शुभहस्ते करण्यात आले. यावेळी माध्यमांचा डी एन ए कोणता ? या विषया वरील हा परिसंवाद देशपातळीवर गाजावा अशा पद्धतीने सादर झाला.या परिसंवादा मध्ये सहभागी झालेले संभाजीनगर येथील ज्येष्ठ पत्रकार मधुकर अण्णा वैद्य,एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक, नवी दिल्ली येथील पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे, पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे, प्रदेशाध्यक्ष गोविंद वाकडे, अँड.महेश भोसले, माजी प्रदेशाध्यक्ष वसंत मुंडे या विचारवंतांना बोलत करणाऱ्या परिसंवादा च्या संवादिका अश्विनी सातव – डोके यांनी परिसंवादामधून विचारांचे मंथन रसिक श्रोत्यांना मंत्रमुग्ध करणारे व्यक्त केले. मराठवाडा भुषण पुरस्कार वितरण



समारंभात प्रास्ताविक करताना मराठवाडा विभागीय अध्यक्ष तथा ज्यांच्या संकल्पनेतून आणि अथक परिश्रमा तून हे नेत्रदिपक अधिवेशन संपन्न झाले ते संपादक अनिल सावंत यांनी आपल्या भाषणात सांगितले की, महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई ही तमाम पत्रकारांची मातृसंस्था असून या संस्थेच्या निर्मितीला २५ वर्ष पुर्ण झाल्याबद्दल पहिले विभागीय अधिवेशन घेण्याचा मान पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांच्या आग्रहास्तव संतभूमी असलेल्या मराठवाड्याला मिळाला. याविभागातील सर्व जिल्हा संस्थांच्या पदाधिकार्यांनी अधिवेशन यशस्वी करण्यासाठी मोलाचे योगदान दिले. त्याबद्दल अनिल सावंत यांनी सर्वांचे आभार मानले. ते आपल्या प्रास्ताविकात म्हणाले, पत्रकारांनी समाजातील फक्त दोष पाहून चालणार नाही. तर चांगले काम करणार्या व्यक्ती आणि संस्थांना लेखनीचे बळ दिले पाहिजे. याच उद्देशाने मराठवाडा भुषण पुरस्काराचे वितरण आम्ही करत असल्याचे सावंत यांनी सांगितले.

याकार्यक्रमात बोलतांना ऑल इंडिया जर्नालिस्ट असोसिएनचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे यांनी राज्यकर्ते आणि प्रसार माध्यम यांचे संबंध आंबटगोड असले पाहिजेत तरच लोकशाही टिकून राहिल असे सांगितले. हे संबंध अधिक गोडही असू नयेत आणि अधिक आंबट ही असू नयेत. आजकाल अनेक राजकिय नेते हे पत्रकारांची आम्हाला भिती वाटते असे बोलत असतात.वास्तविक भिती वाटेल असे जर आपण काहीच केले नाही तर पत्रकारांनाच काय ? कोणालाही घाबरण्याचे कारण नसते असेही वानखेडे म्हणाले. जागतिक आणि राष्ट्रीय स्तरावर च्या अनेक विषयांवर त्यांनी अभ्यासपुर्ण विवेचन केले. प.पू.१००८ महामंडलेश्वर स्वामी शांतिगिरीजी महाराज यांचे मौनव्रत असल्या मुळे त्यांच्या वतीने श्री.स्वामी विवेकानंद शास्त्री यांनी अत्यंत अभ्यासपुर्ण आणि दिलखुलास असे मनोगत व्यक्त केले. आ.संजय किनीकर, मुंबई येथून खास अधिवेशनासाठी आलेल्या एबीपी माझाच्या संपादिका सरिता कौशिक यांनीही परखडपणे आपले मनोगत व्यक्त केले.

हे अधिवेशन यशस्वी करण्यासाठी छत्रपती संभाजीनगरचे शहराध्यक्ष देवीदास कोळेकर, जिल्हा उपाध्यक्ष भांबर्डे, मराठवाडा सल्लागार विलास इंगळे यांच्या सह सचिव मनोज पाटणी, सचिव महेंद्र डेंगळे, प्रसिध्दी प्रमुख सचिन अंभोरे, संपर्क प्रमुख सुजीत ताजणे, सहसचिव रविंद्र लांडगे, ज्ञानेश्वर तांबे, संतराम मगर, आनंद अंभोरे, माधव खिल्लारे, गोपाळजी पटेल, लक्ष्मीनारायण राठी, राजू परदेशी आदिंनी परिश्रम घेतले. संत एकनाथ रंगमंदिर येथे संपन्न झालेले पत्रकारांचे हे विभागीय अधिवेशन न भुतो न भविष्यती अशा स्वरुपाचे होते. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाच्या स्थापनेला २५ वर्ष पुर्ण झाल्या नंतर मराठवाडा विभागामध्ये होणारे पहिले हे रौप्यमहोत्सवी अधिवेशन आयोजित करण्यात आले होते.

**मराठवाडा भूषण २०२५ या पुरस्काराचे हे ठरले मानकरी...**

मराठवाड्यातील विविध क्षेत्रात उत्कृष्ट कामगिरी करणार्या मान्यवरांना मराठवाडा भुषण पुरस्कार देवूनसन्मानित करण्यात आले. यामध्ये वरिष्ठ सनदी अधिकारी जी.श्रीकांत, छत्रपती संभाजीनगर भाजपाचे शहराध्यक्ष किशोर शितोळे, सा.बां. विभागाचे पुणे येथील मुख्य अभियंता अतुल चव्हाण, चंद्रसेन कोठावळे, जयंती कठाळे, चला हवा येऊ द्या मधील प्रसिद्ध हास्य अभिनेता योगेश शिरसाट, प्रशांत गिरी, अशोक देशमाने, बीड येथील सायं दैनिक सिटीजनचे संपादक शेख मुजीब, अरुण पवार, हनुमंत भोंडवे, मधुकर अण्णा वैद्य, लातूर येथील ज्येष्ठ पत्रकार जयप्रकाश दगडे, सचिन चपळगावकर, शिवराज बिचेवार, आशा शेरखाने, कटके, गणेश गायकवाड, प्रशांत गिरे, सुनिल देवरा, बी.एस. स्वामी, मधुकर सावंत, राजेंद्रसिंह सुर्यवंशी यांना व्यासपीठावरील उपस्थित मान्यवरांच्या शुभहस्ते मराठवाडा भूषण २०२५ या मानाच्या पुरस्काराने सन्मानपूर्वक गौरवण्यात आले.

**पत्रकार संघाचे प्रदेश संपर्कप्रमुख वैभव स्वामी यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव...**

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबईचे रौप्य महोत्सवी मराठवाडा विभागीय अधिवेशन छत्रपती संभाजी नगर येथे घेण्यासाठी पत्रकार संघाचे प्रदेश संपर्क प्रमुख वैभव स्वामी यांनी पुढाकार घेतला. त्यांच्या या प्रतिसादाला मराठवाडा विभागीय अध्यक्ष अनिल सावंत यांच्यासह संभाजीनगर चे जिल्हाध्यक्ष डॉ. छबुराव ताके,प्रदेश उपाध्यक्ष अशोक देडे, अभयकुमार दांडगे, प्रदेश निवड समितीचे प्रदेशाध्यक्ष रुपेश पाडमुख आदींनी प्रतिसाद देऊन हे अधिवेशन ऐतिहासिक करत यशस्वीरित्या संपन्न केल्याबद्दल पत्रकार संघाचे संस्थापक अध्यक्ष संजय भोकरे,पत्रकार संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष अशोक वानखेडे पत्रकार संघाचे प्रदेश सरचिटणीस विश्वासराव आरोटे यांनी सर्व टीमचे विशेष कौतुक करत अभिनंदन केले. कार्यक्रमानंतर या टीमवर अक्षरश: अभिनंदनचा वर्षाव झाला.

# खताच्या स्टॉकची आकडेवारी समोर आणा

## कृत्रिम टंचाई किंवा लिंकिंग करणाऱ्यावर कठोर कारवाई करा : धनंजय मुंडे यांच्या परळी कृषी अधिकाऱ्यांना सूचना

परळी वैजनाथ | प्रतिनिधी

पेरणीच्या तोंडावर काही डिलर्स स्वत:कडे खतांचा साठा असून ही लयवत असल्याचा व कृत्रिम टंचाई निर्माण करत असल्याच्या तक्रारी येत असून. कृषी विभागाकडून काही प्रमाणात खत देणे बाकी आसुन आवश्यक साठा तातडीचे उत्सव करून देण्यास यावा. तसेच स्थानिक डिलर्स कडे उपलब्ध असलेल्या साठ्याची आकडेवारीनुसार तात्काळ समोर आणावी, आशा सूचना आज माजी कृषीमंत्री आ.धनंजय मुंडे यांनी खत व्यवस्थापन प्रमुख तसेच परळी तालुका कृषी अधिकारी यांना देण्यात आले. जुन आखेर परळी मतदारसंघात आवश्यक असलेल्या युरियासह साठ्यामध्ये जो



फरक आहे. तो फरक रेक लावुन तात्काळ उपलब्ध करून देण्यात यावा याबाबत वरिष्ठ अधिकाऱ्याचीही धनंजय मुंडे यानी दूरध्वनी वरून संपर्क साधत सूचना केल्या. खताची कृत्रिम टंचाई निर्माण करणे तसेच प्रमुख मागणी असलेल्या व नामांकित खते असून जाणीवपूर्वक लिंकिंग करत निकृष्ट दर्जाचे खते पर्याय व म्हणून जबरदस्तीने विकणाऱ्या डीलर्स व दुकानदाराची नावे उघड करून त्यांच्यावरती तातडीने शासन नियमाप्रमाणे कारवाई करावी असेही सूचना धनंजय मुंडे यांनी अधिकाऱ्यांना दिल्या.

खरीप हंगामाच्या तोंडावर खत बियाण्याच्या पुरवठ्यामध्ये कोणतेही वापराचा हलगर्जीपणा खपवून घेतला जाणार नाही. यासाठी बफर स्टॉक सह जाणार नाही. यासाठी यापुढे प्रत्येक घडामोडी ची आकडे वारी सह माहिती देण्यात यावी. याबाबतही धनंजय मुंडे यांनी अधिकाऱ्यांना सूचना केले आहेत. यावेळी प्र.तहसीलदार श्रीमती.पठाण ए डि ओ गंराडे परळी वैजनाथ अंबाजोगाईचे तालुका कृषी अधिकारी गटविकास अधिकारी संजय केंद्रे, अजय मुंडे, अभय मुंडे, राजेभाऊ चाचा पौळ यासह आदी उपस्थित होते. जनता संवाद गर्दी अंन जागच्या जागीच तोडगा धनंजय मुंडे चा जनता दरबार पुन्हा गाजला.

# बीड नगरपरिषदेचे पूर्वीचे अकाउंटर यांच्याकडे रस्ता कामाची दिलेली फाईल परत देत का नाही?

### सामाजिक कार्यकर्ते करण लोंढे यांनी आज जिल्हाधिकारी यांना निवेदन देऊन गणेश पगारे यांच्यावर कारवाई करण्याची केली मागणी

बीड | प्रतिनिधी



बीड नगरपरिषदेचे पूर्वीचे काउंटर गणेश पगारे साहेब यांच्याकडे रस्ता बिल कामाची फाईल बिल काढण्यासाठी दिली होती. मी सामाजिक कार्यकर्ता असल्यामुळे गणेश पगारे यांच्या कार्यकाळात त्यांनी केलेल्या भ्रष्टाचारावरती मी बोललो म्हणून गेल्या दीड ते दोन महिन्यापासून रस्ता काम पूर्ण केलेली बिल साठी दिलेली फाईल मी देणार नाही असं सांगत आहेत तो माझ्या विरोधामध्ये बोललेला आहे. मी त्याची फाईल देणारच नाही कोणाकडे तक्रारी करायची आहे तर करा मी फाईल देणार नाही कुणीही माझं काही करू शकत नाही असे उत्तर देत आहेत. ह्या प्रकरणाची वेळोवेळी मी प्रशासक कविता जाधव मॅडम यांना माहित दिली परंतु गणेश पगारे वरिष्ठ अधिकाऱ्यांचे देखील ऐकत नाहीत. जिल्हाधिकारी साहेब आपल्याकडून आम्हाला न्यायाची अपेक्षा आहे. आपण निवेदनाची दखल



घेऊन तात्काळ कारवाईचे आदेश द्यावेत नस्ता काही दिवसांमध्ये प्रशासनाच्या विरोधात तीव्र स्वरूपाचे आंदोलन उभे करू याची सर्वस्वी जबावदारी आपल्या प्रशासनावर राहील याची नोंद घ्यावी, करण लोंढे यांनी सांगितले आहे.



# अ.भा. पेशवा संघटनेची नुतन कार्यकारिणी

अंबाजोगाई | प्रतिनिधी

समाज कार्यात सहभागी होण्याच्या उद्देशाने अ.भा.पेशवा संघटना छत्रपती संभाजीनगर अंतर्गत संघटनेची जिल्हा व तालुका निहाय नुतन कार्यकारिणी वरिष्ठ पदाधिकाऱ्यांकडून निवडण्यात आली असून यात जिल्हाध्यक्ष संजय देशपांडे, कार्याध्यक्ष सुधीर धर्माधिकारी, जिल्हा कार्यवाह डॉ. दिलीप कुलकर्णी, जिल्हा उपाध्यक्ष श्रीमती अंजली कुलकर्णी, महेंद्र राडीकर, जिल्हा कोषाध्यक्ष भास्कर देशपांडे, अंबाजोगाई तालुकाध्यक्ष उज्वला कुलकर्णी, जिल्हा संस्कारवर्ग प्रमुख रजनी देशपांडे, केज तालुकाध्यक्ष प्रकाश देशपांडे, धारूर तालुकाध्यक्ष धनंजय कुलकर्णी, वडवणी तालुकाध्यक्ष वैभव चिंचाळकर, बीड शहराध्यक्ष अनिल देवा कुलकर्णी आदींचा समावेश असून या सर्वांचे अभिनंदन होत आहे.

# जि.प.ची काजीपार येथील नूतन प्राथमिक शाळा मोडकळीस तरीही वर्ग सुरू

## पावसाळ्यात कुठल्याही क्षणी शाळा कोसळू शकते विद्यार्थ्यांच्या जीवनात धोका

परळी | प्रतिनिधी

जिल्हा परिषद अंतर्गत काझीपार नूतन प्राथमिक शाळा परळी येथे झ़िपची शाळा अनेक वर्षापासून सुरू आहे. शाळेची स्थापना १९५३ झाली असून. ही शाळा खाजगी मालकीच्या मोडकळीस आलेल्या इमारतीमध्ये विद्यार्थ्यांचे वर्ग भारतात. इमारतीचा मालक भाड्यापोटी वर्षाला लाखो रुपये घेत आहे. रख रखा डागडुजी थातूरमातूर पद्धतीने करतो. ही शाळेची इमारत मोडकळीस आली असून शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांच्या जीवितास धोका निर्माण झाला आहे. तात्काळ मोडकळीस आलेल्या इमारती मधून शाळा इतरत्र हलवा किंवा स्थलांतरित करा, अशी मागणी या भागातील पालकांकडून



केली जात आहे.

दिनांक १६ जुन २०२५ पासून शाळा सुरू झाले आहेत. काजीपार शाळेची सध्या दयनीय अवस्था असून शाळा ही मोडकळी झाली आहे. ही शाळा कधीही पावसात पडू शकते त्यामुळे विद्यार्थ्यांच्या जीवनात धोका निर्माण झाला आहे. गटशिक्षणाधिकारी, शाळेचे मुख्याध्यापक, शाळेच्या इमारतीचा मालक या शाळेत काही दुर्घटना घडली तर जबाबदार असतील. लवकरात लवकर ही शाळा स्थलांतरित करावी किंवा इतरत्र हलवावी. अन्यथा मोठा अनर्थ होऊ शकतो. याला जिल्हा परिषद शिक्षण विभाग कारली होत असेल. तात्काळ उपाययोजना करावी अशी मागणी या भागातील शाळा शिकत असलेल्या विद्यार्थ्यांच्या पालकांनी केली आहे.

# प्रदिप गायकवाड पत्रकारिता क्षेत्रातील मास्टर ऑफ जर्नलिझम परीक्षा उत्तीर्ण

केज | प्रतिनिधी

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, केज तालुका उपाध्यक्ष प्रदिप काशिनाथ गायकवाड यांनी पत्रकारितेच्या क्षेत्रात महत्त्वपूर्ण टप्पा गाठत Master of



Journalism (एम जे) ही पदव्युत्तर पदवी यशस्वीरित्या पूर्ण केली आहे. त्यांनी आपले शिक्षण डॉ. बाबासाहेब आंबेडकर विद्यापीठ छत्रपती संभाजीनगर (औरंगाबाद) संलग्न वसंतराव काळे पत्रकारिता व संगणक महाविद्यालय, बीड येथून पूर्ण करून परीक्षेत उल्लेखनीय कामगिरी केली आहे. प्रदिप काशिनाथ गायकवाड यांनी शिक्षणाच्या काळात आधुनिक पत्रकारिता, मिडिया रिसर्च, न्यूज रिपोर्टिंग, संपादन तसेच डिजिटल मिडिया या विषयांमध्ये विशेष प्रावीण्य मिळवले आहे.


त्यांनी शैक्षणिक प्रबंध व प्रात्यक्षिक कामगिरीद्वारे आपली क्षमता सिद्ध केली आहे. त्यांच्या या यशा बद्दल कुटुंबीय, शिक्षक, मित्रवर्ग आणि पत्रकारिता क्षेत्रातील मान्यवरांकडून अभिनंदन केले आहे. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ मुंबई, केज तालुकाध्यक्ष, चंद्रकांत पाटील सचिव, विजय बिक्कड, आप्पाराव सारूक, नंदुलाल मिसाळ, पांडुरंग कसबे, विश्वास राऊत, स्वानंद बिक्कड, अड.सतीश मस्के यांनी कौतुक केले असुन पुढील वाटचाली साठी शुभेच्छा दिल्या आहेत. भविष्यात प्रभावी पत्रकार म्हणून समाजातील विविध प्रश्नांना वाचा फोडण्याचा आणि सकारात्मक बदल घडवण्याचा त्यांचा मानस आहे असे प्रदिप गायकवाड यांनी प्रतिनिधीशी बोलताना सांगितले.

# प्रत्येक कर्मचाऱ्यांनी सेवानिवृत्तीनंतरचे आयुष्य सामाजिक उन्नतीसाठी खर्च करावे : मंगला खांडेकर

बीड | प्रतिनिधी

शासकीय अथवा निमशासकीय सेवेतून सेवानिवृत्त होणाऱ्या प्रत्येक कर्मचाऱ्यांनी नंतरचे आयुष्यात समाजाच्या उन्नतीसाठी, प्रगतीसाठी आणि सामाजिक कार्यासाठी खर्च करावे असे आवाहन बडे बाबा शिक्षण संस्थेच्या सचिव श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम यांनी श्री नारद स्वामी विद्या मंदिर या शाळेतील सेवक नितीन दादा वाघमारे यांच्या सेवानिवृत्ती निमित्ताने आयोजित करण्यात आलेल्या कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानावरून बोलताना केले. यावेळी व्यासपीठावर युवा संचालक श्री प्रसाद संपतराव खांडेकर, शाळेचे मुख्याध्यापक श्री पाखरे सर, लहूजी शक्तीसेना(अध्यक्ष मराठवाडा) विजय चांदणे, जेष्ठ शिक्षक कागदेसर, सिरसट सर, दाबेकर मॅडम, जाधव, राठोड, सेवक इतापे आदी कर्मचारी उपस्थित होते.

बीड शहरातील नवीन मोंढा मंदिर एम. आय. डी. रोड परिसरात असलेल्या श्री नारद स्वामी विद्या मंदिर या शाळेतील श्री सेवक नितीन दादा वाघमारे हे नुकतेच नियत वयोमानुसार सेवानिवृत्त झाले आहेत. त्यांच्या सेवानिवृत्ती कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या कार्यक्रमाचे



अध्यक्षस्थानी संस्थेच्या सचिव श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम या होत्या. या वेळी नितीन दादा वाघमारे यांच्या विषयी काही मान्यवरांनी आपले मनोगत व्यक्त करताना वाघमारे यांच्या जीवनाविषयी व कार्याविषयी माहिती सांगितली. त्यांचे विचार त्यांच्या कामाचे उदाहरणासह काही किस्से विषद केले. त्यानंतर अध्यक्षस्थानावरून मार्गदर्शन करताना श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम म्हणाल्या की आमच्या संपूर्ण संस्थेमध्ये श्री नितीन वाघमारे हे अत्यंत, शांत संयमी आणि सदैव हसमुख चेहऱ्याचे होते. त्यांनी प्रामाणिकपणे आपली शाळेतील नोकरी यशस्वीरित्या पार पाडली.

सेवक हा शाळेचा महत्वाचा घटक असतो. उद्यापासून नितीन वाघमारे हे आपलं कर्तव्य बनवताना दिसणार नाहीत.

परंतु त्यांची आठवण मात्र कायम येत राहिल. शासकीय अथवा निमशासकीय सेवेत सेवानिवृत्त झालेल्या कर्मचाऱ्यांची जनतेशी नाळ निर्माण झालेली असते. त्यामुळे सेवानिवृत्तीचा काळ हा सामाजिक सेवेत घालवायचा काळ असतो. एकंदरीतच वाघमारे हे देखील सेवानिवृत्ती नंतरचे आयुष्य सामाजिक उन्नतीसाठी खर्च करतील अशी अशा आहे. त्यांच्या आयुष्याच्या दुसऱ्या इनिंगसाठी माझ्या आणि आपल्या सर्व परिवाराच्या खूप खूप शुभेच्छा आणि सदिच्छा आहेत जीवनातील प्रत्येक प्रसंगी आम्ही आपल्यासोबत कायम आहोत असेही यावेळी श्रीमती मंगलाताई खांडेकर मॅडम यांनी सांगितले. या कार्यक्रमास श्री नारदस्वामी विद्यालयातील विद्यार्थी, विद्यार्थीनी शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी शिक्षण प्रेमी नागरिक पालक मोठ्या संख्येने उपस्थितीत होते.

# ऑनलाइन घरकुलासाठी कोणालाही पैसे देऊ नये : नवनाथ शिराळे पाटील

बीड | प्रतिनिधी

सध्या घरकुल ऑनलाईन करण्याची प्रक्रिया १८ तारीख असल्याचे समजते तरी काही दलाल गोरगरीब लोकांना अधिकाऱ्याच्या सांगण्यावरून लोकांच्या खिशावर अधिकाऱ्याच्या संगणमताने डल्ला मारण्याचे काम करत असल्याचे



सध्या दिसत आहे तरी अशा दलालखोर लोकांना कोणीही पैसे देऊ नयेत ऑनलाईन प्रक्रिया ही स्वत: सेल्फ आपल्या मोबाईल वरती करण्यासाठी मोदी सरकारने लोकांच्या हितासाठी ही योजना केलेली आहे. एका मोबाईल वरती एकच घरकुल ऑनलाईन करता येते या घरकुल योजनेच्या वेबसाईटवर जाऊन त्या ठिकाणी आपले आधार लिंक नंबर टाकून नाव नोंदणी करण्यात यावी याच्यासाठी कोणत्याही कर्मचाऱ्याला व त्याच्या दलाला कोणत्याही नागरिकांनी पैसे देऊ नयेत जर कोणी पैसे मागण्याचा प्रयत्न करत असेल तर डायरेक्ट आमच्याशी संपर्क साधावा किंवा पोलीस प्रशासनाचे अँटीकरप्शन पोलीस यांच्याशी संपर्क करावा, असे आवाहन बीड नगर परिषदेचे माजी सभापती तथा भाजपा नेते नवनाथ अण्णा शिरोळे पाटील यांनी केले आहे.

बीड जिल्ह्यामध्ये नगर प्रशासन ग्रामपंचायत पंचायत समिती यांच्या माध्यमातून ही योजना केंद्र सरकार राबवत आहे पण काही कर्मचारी दलाला पुढे करून आपला खिसा चिरीमिरीने भरण्याचा प्रयत्न सध्या करत असल्याचे चित्र सध्या पहावयास मिळत आहे. याला आळा घालण्यासाठी नवनाथ अण्णा शिराळे पाटील यांनी एक पत्रक जारी केले आहे. त्या पत्रकामध्ये त्यांनी स्वत:चा नंबर दिलेला आहे नंबर आहे ९८ २२ ८७५ ९४५ कोणी जर चिरीमिरी मागात असेल तर या नंबर वरती संपर्क करावा किंवा पोलीस प्रशासनाशी संपर्क करावा. लेखी तक्रारीने करावा पैसे कोणालाही पैसे देण्यात येऊ नये ही पंतप्रधान नरेंद्र भाई मोदी यांची योजना आहे असे प्रसिद्धी पत्रकाद्वारे नवनाथ शिराळे पाटील पाटील व माजी नगरसेवक बाबुराव परळकर यांनी कळवले आहे.



केज : कानडी रोड खनून ठेवल्यामुळे टू व्हीलर व येणारी जाणारी माणसे घसरून पडत आहेत. पावसामुळे या रोडवरती घसरण झालेली आहे. या रोडचे काम तात्काळ सुरू करण्यात यावे अशी येथील नागरिकांची मागणी आहे.

# बीड येथील शासकीय विश्रामगृहामध्ये बैठकीचे आयोजन : स्वप्निल वरपे

बीड | प्रतिनिधी

बीडमध्ये प्रथमच धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज यांचं



स्मारक आपण (महालक्ष्मी चौक बीड बायपास) या ठिकाणी बसवलेलं आहे. एवढ्यातच आपलं काम संपलेलं नाही त्याच स्मारकासाठी आपल्याला बऱ्याच अडचणी येत आहेत तर त्याच अडचणी दूर करून त्याच ठिकाणी एक भव्य दिव्य चौक कसा निर्माण करता येईल यासाठी नियोजन बैठक ठेवण्यात आलेली आहे तर दि, १८/०६/२०२५/ वार. बुधवार रोजी ठीक सायंकाळी ७ वाजता बीड शहरातील शासकीय विश्रामगृह रेस्ट हाऊस बीड नगर रोड या ठिकाणी) धर्मवीर छत्रपती संभाजी महाराज स्मारका विषयी महत्त्वाची बैठक ठेवण्यात आलेली आहे. सर्व शिवशंभू प्रेमींना व बीडकरांना नम्रतेची विनंती आहे सर्वांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहावे, असे आवाहन शिवभक्त स्वप्नील वरपे पाटील यांनी केले आहे.

# चला शाळेला - सुट्या संपल्या : जिल्ह्यात उत्साहात गावोगावी शालेय विद्यार्थ्यांचे स्वागत

## १०० शाळात जिल्हाधिकाऱ्यांच्या आदेशाने प्रवेशोत्सव सोहळा संपन्न; वांगीला पोहोचले बीडचे तहसीलदार शेळके

बीड | प्रतिनिधी

वांगी येथे सोमवार दि १६ जून रोजी सन २०२५-२६ या शैक्षणिक वर्षाची सुरुवात जि.प.कें.प्रा. शाळा, वांगी येथे तहसीलदार चंद्रकांत शेळके यांच्या विशेष उपस्थितीत करण्यात आली. या प्रसंगी विदयार्थ्यांना पुष्पगुच्छ, पुस्तके व गणवेश वाटप करण्यात आले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांच्या आदेशाने आज जिल्हाभरात विविध विभागाचे अधिकारी सकाळीच विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यासाठी पोहोचले. विद्यार्थ्यांना शाळेची गोडी लागावी, पहिल्या दिवसापासूनच हजेरी वाढावी आणि एकंदरीतच शैक्षणिक वातावरण निर्मिती व्हावी हा या मागचा उद्देश आहे. अपर जिल्हाधिकारी हरीश धार्मिक, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी व स्वत: जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन विविध शाळांमध्ये उपस्थित होते.

वांगी येथे शाळेत तहसीलदार चंद्रकांत शेळके यांनी १०० टक्के विद्यार्थ्यांची पटनोंदणी व्हावी व स्थानिक स्वराज्य संस्थांच्या शाळांच्या इयत्ता १ ली च्या पटात लक्षणीय वाढ होण्याच्या दृष्टीने प्रयत्न करावेत, गावातील अंगणवाडी व बालवाडी



यांना शिक्षकांनी भेट देऊन त्यातील इयत्ता पहिलीमध्ये दाखल पात्र विद्यार्थी यादी घ्यावी व त्यांचा प्रवेश करून घ्यावा, जिल्हा परिषद शाळांमधील सोयी सुविधा, शिष्यवृत्ती, विविध उपक्रम याबाबत पालकांना माहिती द्यावी अशा सूचना शिक्षकांना दिल्या. त्यांनी विदयार्थ्यांशी संवाद साधताना त्यांना जीवनात असलेले शिक्षणाचे महत्व पटवून दिले. शाळेतील विदयार्थ्यांची संख्या वाढण्यासाठी प्रयत्न करावेत असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना त्यांनी विदयार्थ्यांचा शिक्षणाबरोबरच कला, क्रीडा, आरोग्य असा सर्वांगीण विकास व्हावा अशी अपेक्षा व्यक्त केली. शिक्षकांबरोबरच गावातील इतर उच्चशिक्षित नागरिकांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षा, सामान्य ज्ञान याबाबत मार्गदर्शन करावे तसेच पर्यावरणाचा समतोल राखण्यासाठी झाडांचे महत्व सांगून वृक्षारोपण करण्याचे आवाहन केले.

तहसीलदार शेळके यांनी फार्मर आयडी, जिवंत ७/१२ मोहीम, विविध शासकीय योजना, संजय गांधी निराधार योजना, श्रावण बाळ योजना, ग्रामस्वच्छतेबाबत मार्गदर्शन केले. तसेच त्यांनी गावागावात विविध शिबिरे घेऊन गावातच लोकांना त्यांची कामे पूर्ण करून द्यावी, असे आवाहन केले. शेतकऱ्यांनी ई पीक पाहणी करणे बाबत मार्गदर्शन केले. तसेच शेतकऱ्यांना विविध शासकीय योजनांचा लाभ घेण्यासाठी आवाहन केले. शेतकऱ्यांचे प्रश्न गाव पातळीवरच मिटवून त्यांना न्याय देण्यात यावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

केंद्रप्रमुख आजिनाथ हाडूळे यांनी प्रस्तावना करताना शाळेविषयी आणि एकंदरीतच गावाविषयी सविस्तर माहिती दिली. वांगी हे गाव निसर्गाच्या कुशीत वसलेले गाव असून चारही बाजूने डोंगरांनी वेढलेले गाव आहे. आजकाल दळणवळणाच्या सुविधा दिसून येत असल्या तरी यापूर्वी अशा सुविधा नव्हता. तथापि अशा प्रतिकूल परिस्थितीतून सुद्धा या गावाने अनेक नोकरदार, अनेक अधिकारी कर्मचारी, डॉक्टर, इंजिनिअर घडविले असल्याचे त्यांनी सांगितले. तहसीलदार शेळके विद्यार्थी व शिक्षकांशी संवाद साधताना त्यांच्या अडचणी, तक्रारी समजावून घेतल्या व त्याचे निरसन करण्याची शाश्वती दिली. उपस्थित शिक्षकांनी विद्यार्थ्यांच्या गुणवत्तेबद्दल माहिती दिली. विद्यार्थ्यांच्या प्रगतीसाठी सर्व शिक्षक प्रयत्नांची पराकष्ठा करत असून या शाळेमधून अनेक गुणवंत विद्यार्थी घडत आहेत असे सांगितले. कार्यक्रमास विद्यार्थ्यांचा उत्फूर्त प्रतिसाद होता. त्यांनी शाळेत मध्यान्ह आहार उत्तम असतो, शाळेत मोफत पुस्तके मिळतात इ. माहिती दिली.

ग्राम महसूल अधिकारी राधिका बहीर यांनी नमूद केले की गावातील सर्व नागरिकांना, शेतकऱ्यांना वेळेवर सुविधा पुरविण्यात येतात. सर्व शेतकऱ्यांनी फार्मर आयडी काढून घ्यावा. तसेच जिवंत सातबारा मोहीम दोनचा लाभ घ्यावा. सध्या महाराजस्व अभियान सुरू आहे, त्या अनुषंगाने महसूल विभागाच्या अनेक योजनांचा आपण लाभ घेऊ शकता, असेही त्यांनी सांगितले. या कार्यक्रमास ग्राम महसूल अधिकारी राधिका बहीर, अशोक वाघमारे, केंद्रप्रमुख आजिनाथ हाडूळे, मुख्याध्यापक निरंजन धनवे, मुख्याध्यापक निरंजन धनवे, अशोक वाघमारे, बाबुराव शेळके, महादेव शेळके, शिक्षक आनंद शिंदे, सी.एस.सी.चालक रोहित राऊत, इतर शिक्षक व ग्रामस्थ उपस्थित होते.

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक दीपक इंदर थोरात यांनी निर्मिती प्रिंटस्, धोंडीपुरा, टिळक रोड, जोशी नर्सिंग होमसमोर, बीड ता.जि.बीड-४३११२२ येथे छापुन कार्यालय सायं.दैनिक महाराष्ट्र आरंभ, घर नं.१-७-३८१,जुन्या पोलीस अधीक्षक कार्यालयाजवळ, थोरातवाडी बीड-४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक - दीपक इंदर थोरात

THIS NEWSPAPERS IS PRINTED BY OWNER , PRINTER, PUBLISHER DEEPAK INDAR THORAT AT THE NIRMITI PRINTS,TILAK ROAD , DHONDIPURA, IN FRONT OF JOSHI NURSING HOME, BEED, TQ.BEED DIST.BEED-431122 (MH) AND PUBLISHED AT. THE OFFICE OF DAILY EVENING MAHARASHTRA AARAMBH , H.NO.1-7-381, NEAR OLD S.P. OFFICE,THORATWADI, BEED TQ.DIST.BEED -431122 EDITOR - DIPAK INDAR THORAT